NAREDCO MAHARASHTRA

MINEPRO COMMUNICATIONS
new-age image & reputation curators

पुण्य नगरी

# 'इन्फ्रास्ट्रक्चर रिस्क गॅरंटी फंड' बळकट करणार खासगी विकासकांचे धोका व्यवस्थापन

**नवी दिल्ली** : अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी रविवारी अर्थसंकल्पात 'इन्फ्रास्ट्रक्चर रिस्क गॅरंटी फंड' स्थापन करण्याचा प्रस्ताव मांडला. या फंडाद्वारे कर्जदात्यांना अंशतः क्रेडिट गॅरंटी दिली जाईल, ज्यामुळे खासगी विकासकांना पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या विकास व बांधकाम टप्प्यात धोके व्यवस्थापित करण्यास मदत होईल.

मागील दशकात सार्वजनिक पायाभूत सुविधा वाढवण्यासाठी सरकारने अनेक उपाययोजना केल्या आहेत. यात इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हटमेन्ट रिस्क गॅरंटी फंड, रियल इस्टेट इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट तसेच एनआयएएफ व नॅबफीड यांसारख्या संस्थांमार्फत नवीन वित्तीय साधने तयार केली गेली आहेत.

पायाभूत सुविधा विकास व बांधकाम टप्प्यातील धोके लक्षात घेऊन खासगी विकासकांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी,हा स्थापन करण्याचा प्रस्ताव मांडत आहे. या फंडाद्वारे कर्जदात्यांना सावधगिरीने अंशतः क्रेडिट गॅरंटी दिली जाईल, सीतारामन म्हणाल्या.

शहरे भारताची वाढ, नवोन्मेष आणि संधीची यंत्रे आहेत, आणि आता सरकार टियर-२व टियर-३ शहरांवर,



तसेच मंदिर-शहरे जिथे आधुनिक पायाभूत सुविधा आणि मूलभूत सोयींची आवश्यकता आहे, त्यावर लक्ष केंद्रित करेल. अर्थसंकल्पाचा उद्देश शहरे आर्थिक सामर्थ्याने भरभराटीस सक्षम करतील, यासाठी शहर आर्थिक प्रदेश तयार केले जातील, त्यांच्या विशिष्ट वाढीच्या चालकांवर आधारित असतील. शहर आर्थिक प्रदेश प्रत्येकासाठी पुढील पाच वर्षांत ५,००० कोटींचा निधी त्यांच्या योजना अंमलात आणण्यासाठी 'चॅलेंज मोड' आणि सुधारणा-आधारित वित्तीय यंत्रणेद्वारे दिला जाईल, सीतारामन यांनी सांगितले.

### नवीन विकास केंद्रांना चालना

भांडवली खर्चात १२.२ लाख कोटी रुपयांपर्यंत मोठी वाढ, दुसऱ्या व तिसऱ्या दर्जाच्या शहरांवर विशेष भर यांतून हे बजेट मेट्रो शहरांपलीकडे रिअल इस्टेटसाठी शक्तिशाली मागणीचा उत्प्रेरक म्हणून काम करेल. यांतून नवीन विकास केंद्रे निर्माण होऊन शहरी निवासांच्या मागणीत वाढ होईल व हे घटक देशाच्या रिअल इस्टेट विस्ताराचे इंजिन बनतील. विशेषतः महाराष्ट्रासाठी, सुधारित कनेक्टिव्हिटी, शहरी पायाभूत सुविधा निधी आणि विकास कॉरिडॉरवर भर देणे, हे शहरी केंद्रांमध्ये निवास मागणी वाढवेल आणि पुनर्विकास वेगवान करेल.

– **प्रशांत शर्मा**, अध्यक्ष, नरेडको महाराष्ट्र,

### रिअल इस्टेटसाठी मजबूत पाया

केंद्रीय अर्थसंकल्प भारताच्या रिअल इस्टेट क्षेत्रासाठी मजबूत पाया ठरतो, कारण यात पायाभूत सुविधा गुंतवणुकीत लक्षणीय वाढ करण्यात आली आहे. चालू आर्थिक वर्ष २०२७ साठी भांडवल खर्च १२.२ लाख कोटीवर वाढवला गेला आहे, जो आतापर्यंतचा सर्वोच्च आहे. यामुळे शहरी व उदयोन्मुख बाजारपेठांमध्ये कनेक्टिव्हिटी व आर्थिक क्रियाशीलता वाढेल – **सारांश त्रेहन**, व्यवस्थापकीय संचालक, त्रेहान ग्रुप

Mumbai Edition
Feb 02, 2026 Page No. 08
Powered by: erelego.com



UNION BUDGET
F.Y. 2026 - 27